कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत "यूपीएससी प्रतिभा सेतू" (UPSC Pratibha Setu) पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या राज्यातील उच्चशिक्षित व गुणवंत उमेदवारांमधून कंत्राटी तत्वावर निवड करण्यासाठी समिती गठीत करणे.......

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : कौरोउ-२०२६/प्र.क्र.१०५/कौशल्य-१**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०३.०८.२०२६

**प्रस्तावना:**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला होता. सदर आढाव्यादरम्यान विभागाच्या कामकाजात गुणवत्ता आणण्यासाठी विभागांतर्गत मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असून कंत्राटी तत्त्वावर पदे भरण्याची आवश्यकता निदर्शनास आली. त्याअनुषंगाने, विभागाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी केंद्र शासनाच्या "यूपीएससी प्रतिभा सेतू" (UPSC Pratibha Setu) पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या राज्यातील उच्चशिक्षित व गुणवंत उमेदवारांमधून कंत्राटी तत्त्वावर विभागांतर्गत निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी राज्य स्तरावर ५ सदस्यांची समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत **"यूपीएससी प्रतिभा सेतू" (UPSC Pratibha Setu)** पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या राज्यातील उच्चशिक्षित व गुणवंत उमेदवारांमधून कंत्राटी तत्वावर निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | समिती सदस्यांचे पदनाम / नाव | समितीतील स्थान |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई | अध्यक्ष |
| २. | श्रीमती आंचल गोयल, अतिरिक्त प्रकल्प संचालक-DAKSH, तथा जिल्हाधिकारी, मुंबई | सदस्य |
| ३. | श्री. सौरभ कटियार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | सदस्य |
| ४. | श्री. सिद्धार्थ भारवानी, तज्ज्ञ | सदस्य |
| ५. | उपसचिव (कौशल्य-१), कौशल्य विकास विभाग | सदस्य-सचिव |

२. **समितीची कार्यकक्षा व कार्यपद्धती:**

सदर समिती प्रतिभा सेतू पोर्टलवरून उत्सुकता दर्शविलेल्या, DAF द्वारे डेटा प्राप्त उमेदवारांची ऑनलाईन आयोजित करेल. उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार व मुलाखतीतील कामगिरीनुसार गुणवत्ता यादी तयार करून अंतिम निवडीची शिफारस शासनाकडे करेल. संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक व विहित निकषांनुसार पार पाडण्याची जबाबदारी समितीची राहील.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८०३१७५०३१३४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUHAS SURESH LONDHE

Digitally signed by SUHAS SURESH LONDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=72F5A8BDA98ABD91F6771AA4954C7A568DB9BE0D34E9B7D8CA11F7E498D5BDAC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C094A14D19CC056505E16E4DA4AA92A3F06044757112DAE353EAFAB8BE3E55B6, cn=SUHAS SURESH LONDHE
Date: 2026.08.03 17:52:08 +05'30'

**(सुहास लोंढे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय रवाना:**.

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS), मुंबई.
३. संबंधित समिती सदस्य (सर्व).
४. निवड नस्ती (कौशल्य-१).